| MHJN020001352017 | नि. दि. दावा क्र.११/२०१७<br>अर्जुन–वि–रामेश्वर व ईतर |
|---|---|

## निशाणी क्र.४४ वरील आदेश

**(दिनांक २४/०७/२०२६ रोजी पारीत)**

प्रस्तुत प्रकरणातील मुळ प्रतिवादी क्र.३३ वैजनाथ सखाराम देशमाने यांचे दिनांक २४/०६/२०२२ रोजी निधन झाल्यामुळे त्यांच्या वारसांना अभिलेखामध्ये समाविष्ट करण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यास्तव प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

### वादीचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे–

२. वादी यांनी प्रस्तुतचा दावा वाटणी आधारे स्वतंत्र ताबा मिळणे बाबत, विक्रीपत्र रद्द करणेसाठी व विक्रीपत्र बंधनकारक नाही, असे घोषीत होवून मिळणेकामी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला असून तो प्रलंबीत आहे. परंतु प्रतिवादी क्र.३३ वैजनाथ सखाराम देशमाने यांचे दिनांक २४/०६/२०२२ रोजी निधन झालेले असून वादी हा कामानिमित्त बाहेरगावी गेलेला असल्यामुळे वादीची विधिज्ञांशी भेट होवू शकली नाही. त्यामुळे सदर अर्ज दाखल करण्यास ३ वर्ष १० महिना १४ दिवसांचा विलंब झाला आहे.

३. मयत प्रतिवादी क्र.३३ वैजनाथ सखाराम देशमाने यांचे निधन

दिनांक २४/०६/२०२२ रोजी झालेले असून त्यांच्या वारसांना अभिलेखात समाविष्ट करण्याची ९० दिवसाची मुदत म्हणजे दिनांक २४/०६/२०२२ पासून ते आज पर्यंत ०३ वर्ष १० महिना १४ दिवसाचा विलंब झालेला आहे. सदर विलंब माफ करुन मयताच्या वारसांना अभिलेखात समाविष्ट करणे आवश्यक आहे. सदरचा विलंब हा वादी बाहेरगावी गेला असल्यामुळे विधिज्ञांना माहिती न देवू शकल्यामुळे झाला आहे. तसेच, वादी मयताच्या वारसांना विहित मुदतीत अभिलेखात समाविष्ट करु शकला नाही. सबब मयत वैजनाथ सखाराम देशमाने यांचे वारस अभिलेखावर घेण्याबाबत झालेला विलंब माफ करुन त्यांचे वारसांना अभिलेखात समाविष्ट करण्याची परवानगी मंजूर करावी, अशी विनंती केली.

४. प्रतिवादी क्र.१ यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे सादर केले. निशाणी क्र.४४ वर दिलेले म्हणणे ग्राहय धरण्यात यावे, अशी विनंती केली.

५. प्रस्तुत अर्ज, अभिलेखावरील दस्तऐवज आणि लेखी जबाबाचे अवलोकन केले.

६. वादी आणि प्रतिवादी क्र.१ यांचा मौखीक युक्तीवाद ऐकला.

७. वादी यांनी प्रस्तुतचा दावा सरसनिरस वाटणी होउन स्वतंत्र ताबा मिळणे बाबत, विक्रीपत्र रद्द करण्यासाठी व विक्रीपत्र बंधनकारक नाही, असे घोषीत होऊन मिळणेकामी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. प्रस्तुत

दाव्यातील मुळ प्रतिवादी क्र.३३ वैजनाथ सखाराम देशमाने यांचे दिनांक २४/०६/२०२२ रोजी निधन झालेले असून वादी कामानिमित्त बाहेरगावी गेला असल्यामुळे विधिज्ञांना माहिती देवू शकला नसल्यामुळे त्यांना मयताचे वारस अभिलेखावर घेण्यास विलंब झालेला आहे. दावा गुणदोषावर निकाली काढण्याच्या दुष्टीने प्रस्तुत अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. करीता मयत प्रतिवादी क्र.३३ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब खर्च रक्कम रुपये १,०००/– भरण्याच्या अटीवर निशाणी क्र.४४ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो. सबब, पुढील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे–

## आदेश

| | |
|---|---|
| १ | वादीचा निशाणी क्र.४४ वरील अर्ज खर्च रक्कम रुपये १,०००/– जिल्हा विधि सेवा प्राधिकरण, जालना यांच्या कार्यालयात भरणा करण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो. |
| २ | मुळ प्रतिवादी क्र.३३ वैजनाथ सखाराम देशमाने यांचे वारस अभिलेखावर घेण्याबाबत झालेला विलंब माफ करण्यात येतो. |
| ३ | वादीस निर्देशित करण्यात येते की, त्यांनी प्रस्तुत प्रकरण जुने असल्यामुळे लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी सहकार्य करावे. |
| ४ | आदेशाप्रमाणे निशाणी क्र.४४ वरील अर्ज निकाली काढण्यात येतो. |

ASHVINI PRAVIN DIWAN
Digitally signed by ASHVINI PRAVIN DIWAN
Date: 2026.07.24 16:20:31 +0530

(अश्वीनी प्र. दिवाण)

दिनांक २४.०७.२०२६ दिवाणी न्यायाधीश (व.स्तर), जालना

**प्रमाणपत्र**

निवेदन करण्यात येते की,पी.डी.एफ.फाईल मधील शब्द न् शब्द मुळ आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव :– एम. डी. आढे
न्यायालयाचे नाव :–दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),जालना
पी.डी.एफ.दिनांक :– २४.०७.२०२६

सही/–
लघुलेखक